महाराष्ट्र जनशक्ती

**ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३४८ वा | दिनांक : ०२/१२/२०२५ | वार : मंगळवार







# अजितदादा - एकनाथ शिंदेसह २० नेते अडचणीत



**मुंबई :** राज्यातील नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी प्रचाराची रणधुमाळी शिगेला पोहोचली असतानाच निवडणूक आयोगाने राजकीय नेत्यांना मोठा दणका देण्याची तयारी केली आहे. प्रचाराच्या ओघात मतदारांना आर्थिक प्रलोभने दाखवणे आणि निधीची धमकी देणे, यांसारखी विधाने करणाऱ्या नेत्यांची निवडणूक आयोगाने गंभीर दखल घेतली आहे. यामध्ये खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार आणि भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्यासह २० बड्या नेत्यांचा समावेश असून, आयोगाने संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडून तात्काळ अहवाल मागवला आहे. मंगळवारी (उद्या) राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी मतदान होत असून, बुधवारी मतमोजणी पार पडणार आहे. आज प्रचाराचा शेवटचा दिवस असल्याने सर्वच पक्षांनी ताकद पणाला लावली आहे. मात्र, शेवटच्या टप्प्यात ही कारवाईची बातमी आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आचारसंहितेचा भंग होईल अशी वक्तव्ये करणाऱ्या २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे.

आयोगाच्या रडारवर असलेल्या नेत्यांनी भरसभेत मतदारांना आकर्षित करण्यासाठी किंवा धमकावण्यासाठी विविध विधाने केल्याचा आरोप विरोधकांकडून करण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी "तुमच्या हातात मत आहे, तर माझ्या हातात निधी आहे. राष्ट्रवादीला मतदान न केल्यास निधीला कात्री लावणार," अशा आशयाचे विधान केले होते. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अप्रत्यक्षपणे 'तिजोरीच्या चाव्या' संदर्भातील वक्तव्य केले होते. मंत्री गुलाबराव पाटील यांनी मतदानाच्या आदल्या रात्री 'लक्ष्मी दर्शन' होणार असल्याचे विधान केले होते. तर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी "खा कुणाचंही मटण, पण दाबा कमळाचं बटण," असे विधान केले होते.

निवडणूक आयोगातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, अशा प्रकारची वादग्रस्त विधाने करणाऱ्या सुमारे २० नेत्यांची यादी तयार करण्यात आली आहे. आयोगाने ज्या ठिकाणी ही वक्तव्ये झाली, त्या ठिकाणच्या जिल्हाधिकाऱ्यांना व्हिडिओ रेकॉर्डिंग तपासून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# नगर परिषद, नगरपंचायत निवडणूक सुधारित वेळापत्रक




**मुंबई :** नगर परिषदा व नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध जिल्हा न्यायालयात अपील झालेल्या प्रकरणांसंदर्भात २३ नोव्हेंबर २०२५ किंवा त्यानंतर निर्णय आलेल्या २४ अध्यक्षपदांच्या आणि विविध ठिकाणच्या १५४ सदस्य पदाच्या जागांवरील निवडणुकांची प्रक्रिया अपील कालावधीनंतरच्या पुढील टप्प्यापासून सुधारित कार्यक्रमानुसार राबवली जाईल, त्यासाठी २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होणार आहे. उर्वरित अन्य सर्व ठिकाणी नियोजित निवडणूक कार्यक्रमानुसार २ डिसेंबर २०२५ रोजी मतदान होईल.

राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. आता निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने संबंधित ठिकाणी सुधारित कार्यक्रमाप्रमाणे निवडणूक प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. अध्यक्षपदासंदर्भातील अपिलांचा निकाल उशिरा आलेल्या नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या संपूर्ण क्षेत्रासाठी निवडणूक प्रक्रिया सुधारीत कार्यक्रमानुसार राबविली जाईल. अध्यक्षपदासोबतच सदस्यपदांची एकत्रित निवडणूक घेण्याची कायद्यात तरतूद आहे. ज्या ठिकाणच्या सदस्यपदासाठी अपील होते, तिथे मात्र फक्त त्या जागेपुरताच सुधारित निवडणूक कार्यक्रम राबविला जाईल.

अपील कालावधी-नंतरच्या टप्प्यांसाठीच्या सुधारित कार्यक्रमानुसार आता १० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत नामनिर्देशनपत्र मागे घेता येतील. अंतिमरीत्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी आणि निवडणूक चिन्हांचे वाटप ११ डिसेंबर २०२५ रोजी होईल. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता सुरू होईल.

# दबावाखाली काम करणारा असा निवडणूक आयोग कधीच पाहिला नाही : बाळासाहेब थोरात



**मुंबई :** महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अचानक निर्माण झालेल्या गोंधळावरून राज्यातील राजकारण तापले आहे. अनेक नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवड प्रक्रिया मतदानाच्या केवळ एक दिवस आधीच पुढे ढकलण्यात आल्या, त्यामुळे उमेदवार आणि मतदारांमध्ये संभ्रम वाढला आहे. या पार्श्वभूमीवर संगमनेर येथे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी निवडणूक आयोगावर टीका केली.

माझ्या राजकीय प्रवासात असा गोंधळलेला आणि दबावाखाली काम करणारा निवडणूक आयोग मी कधीच पाहिला नाही, अशा शब्दांत त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, पूर्वीचे निवडणूक आयोग स्वायत्तपणे काम करायचे, परंतु आता आयोग सरकारच्या दिशेनुसार निर्णय घेत असल्याचे चित्र आहे. निवडणुका एक दिवस आधी पुढे ढकलणे, काही ठिकाणी प्रक्रिया थांबवणे, तर काही ठिकाणी जुन्या याद्यांवरून मतदानाची तयारी ठेवणे, या कृतींमुळे लोकांचा आयोगावरचा विश्वास ढासळत असल्याची टीका त्यांनी केली.

थोरात यांनी यावेळी सर्वोच्च न्यायालयाने आरक्षणाबाबत दिलेल्या स्पष्ट आदेशांकडे आयोग दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला. न्यायालयाने आरक्षणाचा प्रश्न सुटल्याशिवाय निवडणुकांबाबत निर्णय घेऊ नये, असे आदेश पूर्वी दिले होते. तरीही कार्यक्रम आखताना सर्व घटकांचा विचार न केल्याने हा गोंधळ निर्माण झाला. सर्वोच्च न्यायालय सांगते एक आणि आयोग करतो एक. मग प्रश्न पडतो, नेमकं राज्यात लोकशाही चालते की सत्तेची मनधरणी? असा सवालही त्यांनी केला. निवडणूक कार्यक्रम तीन-तीन वेळा बदलला जात असल्याने उमेदवारांचे नियोजन बिघडत आहे आणि मतदारही गोंधळात पडले आहेत. हे सर्व लोकशाहीच्या आरोग्यासाठी धोकादायक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

त्यांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित केला. निवडणूक आयोग स्वतः निर्णय घेणार की मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सांगतील तसं वेळापत्रक जाहीर करणार? प्रत्येक वेळी सत्ताधाऱ्यांच्या इशाऱ्यावर कार्यक्रम बदलला जाणार असेल तर आयोगाचे अस्तित्वच शंकेखाली येते, असा प्रश्न थोरातांनी केला. निवडणुकांपूर्वीच मतदार याद्यांतील घोळ, काही ठिकाणी चुकीचे प्रभाग वर्गीकरण, काही भागात हजारो मतदार एका वॉर्डातून दुसऱ्यात टाकणे, अशा सर्व विसंगती आयोगाच्या नियोजनशक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतात. लोकशाहीतील सर्वात महत्त्वाची प्रक्रिया म्हणजे मतदान, आणि त्यातच गैरव्यवहार दिसला तर भविष्यात जनतेचा लोकशाहीवरचा विश्वास डळमळीत होऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ डिसेंबर २०२५


# सिद्धार्थ महाविद्यालयात जागतिक एडस दिन उत्साहात संपन्न




**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** सिद्धार्थ ग्रंथालय व माहितीशास्त्र महाविद्यालय, सानिका कॉलेज ऑफ नर्सिंग, पडेगाव छत्रपती संभाजी नगर येथे जागतिक एड्स दिवस उत्साहात संपन्न करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी प्राध्यापक आणि कर्मचारी उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून रमाई प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. चारुलता मगरे ह्या उपस्थित होत्या. तर प्राचार्य डॉ. मनोहर वानखडे अध्यक्षस्थानी होते.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर मनोहर वानखडे म्हणाले , एडस हा एक असा आजार आहे जो एचआयव्ही या विषाणूमुळे होतो .हा विषाणू आपल्या शरीराची रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत करतो. ज्यामुळे सामान्य आजारांचाही सामना करणे कठीण होते. एडस ची सुरुवात जागतिक आरोग्य संघटनेने १९८८ मध्ये केली होती. एचआयव्हीचा संसर्ग ही एक जागतिक आरोग्य समस्या आहे. एडस हा रोग असुरक्षित लैंगिक संबंध तसेच इतर व्यक्तींसोबत सुई किंवा सिरींज शेअर करणे तसेच गर्भवती महिलेकडून तिच्या बाळाला होऊ शकतो. तसेच न्हाव्याकडे कटिंग करताना किंवा दाढी करताना ब्लेड चेंज करणे आवश्यक असते . त्यामुळे सुद्धा एडस हा रोग वाढू शकतो. महत्त्वाचे म्हणजे एडस झालेल्या व्यक्तींना सहानुभूती दाखवा आणि त्यांना समजण्याच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी मदत करा त्यांच्याबद्दल कोणताही भेदभाव करू नका असे जे म्हणाले याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. शीलवंत गोपनारायण प्रा.सुकेशनी जाधव , प्रा. रेणुका जाधव, प्रा.योगिता मोरे ,प्रा .अंजली श्रॉफ, प्रा. वैशाली जगताप, प्रा .पुजा गिरी, देवा रत्नपारखे ,असित शेगावकर ,मोईन तडवी, अनिता काकरवाल इत्यादी मोठ्या संख्येने उपस्थित होते.मोठ्या संख्येने प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कवी राजेंद्र दिघे यांच्या हस्ते होणार तिफण राज्यस्तरीय कविता महोत्सवाचे उदघाटन



**कन्नड (अरुण थोरात) :** त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, आणि भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड यांच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतिज्योती सावित्री बाई फुले जयंती निमित्त ५ जानेवारीत सुप्रसिद्ध कवी नारायण सुमंत यांच्या अध्यक्षते खाली बालखेडा ता. कन्नड संपन्न होणाऱ्या आठव्या राज्यस्तरीय तिफण कविता महोत्सवाचे उदघाटन प्रख्यात कवी राजेंद्र दिघे (मालेगांव ) यांच्या हस्ते होणार आहे. शिक्षक असलेले राजेंद्र दिघे हे कवी, लेखक, पत्रकार आणि वाङ्मयीन चळवळीतील सक्रिय कार्यकर्ते आहेत. त्यांचे काळ्या आईची तहान हा ग्रामीण कवितासंग्रह, शाब्बास गुरुजी हे व्यक्ति चित्रात्मक पुस्तक तर बालकविता संग्रह ही प्रसिद्ध झालेला आहे. त्याशिवाय अनेक पुस्तके प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. भावलेली माणसं हे व्यक्तिचित्रणात्मक सदर लेखन ते नगारा या नियतकालिकात करित आहेत. अखिल भारतीय साहित्य संमेलनाशिवाय त्यांनी अनेक राज्यस्तरीय साहित्य संमेलनात काव्यवाचन केले आहे. ते आई प्रतिष्ठान चे अध्यक्ष असून ग्रामीण साहित्य संमेलनाचे व अन्य वाङ्मयीन उपक्रमाचे ते सातत्याने आयोजन करतात. वैजापूर तालुक्यात सहा ग्रामीण साहित्य संमेलनाचे त्यांनी यशस्वी आयोजन करून नवलेखकासह मान्यवरांना त्यांनी व्यासपीठ मिळवून दिलेले आहेत. अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. शिक्षक संघटनेत ही ते सक्रिय आहेत. त्यांच्या या समग्र योगदानाची दखल घेवून उदघाटक म्हणून त्यांना निमंत्रित केले आहे. त्यांच्या निवडीबद्दल संयोजन समितीचे मार्गदर्शक प्राचार्य डॉ. विजय भोसले, डॉ. सीताराम राठोड ,ॲड. कृष्णा जाधव, उत्तमराव राठोड, स्वागताध्यक्ष अशोकराव शेवगण, पुंडलिकराव डहाके, सागर जाधव, गणेश घुगे,कविता महोत्सवाचे संयोजक प्रा. डॉ. शिवाजी हुसे, डॉ. रामचंद्र झाडे,संशोधन परिषदेचे शाखा अध्यक्ष प्रविण दाभाडे, अरुण थोरात,ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, ब्रम्हगिरी गोस्वामी, श्रीराम दापके, भीमराव सोनवणे, संदीप ढाकणे, संदीप वाकडे, भरत सोनवणे, अनिता राठोड, शुभदा देवरे, गितांजली गजबे, अजय दवंडे, समाधान निकम, अमोल मोकासे, प्रकाश शहरवाले, सुरेश औटे, का. का. थोरात, शिवनाथ गायकवाड, प्रा. सूर्यकांत सांभाळकर, प्रा. रमेश वाघचौरे, सुभाष काळे, आदींनी अभिनंदन केले आहे.

## शेख बने शेख हुसेन यांची भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक जिल्हा संघटन महामंत्री पदी निवड



**दौलताबाद (जावेद अहमद) :** येथील शेख बने शेख हुसेन यांची भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक मोर्चा जिल्हा छत्रपती संभाजी नगर अल्पसंख्याक जिल्हा संघटन महामंत्री पदी निवड झाली असल्याचे पत्र भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हा अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्ष अजीम मणियार यांनी दिले आहेत्यांच्या या निवडी बद्दल मोबिन शेख, सत्तार शेख,सलमान खान, नईम शेख,प्रकाश रुपेकर, एकनाथ गायकवाड, संतोष थोरात, अजगर पठाण,तोफिक शेख, सादिक शेख,विलास जाधव, शाहरुख शेख, शेख सलीम आदींनी स्वागत केले आहे





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ डिसेंबर २०२५


## चित्रपट हे समाज प्रबोधनाचे प्रभावी माध्यम - पोलीस निरीक्षक सानप



**कन्नड (अरुण थोरात):** "सहकार महर्षी बाळासाहेब पवार कन्नड फिल्म फेस्टिवलच्या माध्यमातून कन्नड भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे उत्तमोत्तम चित्रपट पाहण्याची संधी मिळत आहे. दर्जेदार चित्रपट मनोरंजना बरोबर उद्बोधन करतात" असे मत कन्नड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आर बी सानप यांनी व्यक्त केले. सहकार महर्षी बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालय कन्नड व बाळासाहेब पवार फाऊंडेशन कन्नड यांच्या वतीने ता. २७ व २८ नोव्हेंबर दरम्यान आयोजित सहकार महर्षी बाळासाहेब पवार कन्नड फिल्म फेस्टिवल वर्ष चौथे च्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. श्री सानप म्हणाले "चित्रपट हे प्रभावी माध्यम असून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला प्रोत्साहन देत त्यांना विविध विषयांवर विचार करण्यास प्रवृत्त करण्याचे काम चांगले चित्रपट करू शकतात " या प्रसंगी प्राचार्य डॉ व्ही एन भोसले, प्राचार्य डॉ राहुल क्षीरसागर, वाचनालायचे सचिव रामकृष्ण पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या दोन दिवशीय फिल्म फेस्टिवलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ऑस्कर विजेता चित्रपट 'फ्लो', उत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार मिळालेला ' श्यामची आई' ' बेस्ट म्युझिकल अॅडव्हेंचर फिल्म पुरस्कार प्राप्त 'मोआना', बेस्ट फिल्म पुरस्कार मिळालेला 'आय अॅम कलाम' इत्यादी दर्जेदार चित्रपट दाखवण्यात आले. शहरातील बारा शाळेतील बाराशे विद्यार्थ्यांनी या फिल्म फेस्टिवल ला हजेरी लावली. चित्रपट पाहिल्यानंतर समूह चर्चेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सामील होत आपली मते मांडली. समारोप प्रसंगी एडवोकेट कृष्णा जाधव यांनी "सिनेमा हे सशक्त माध्यम आहे. सिनेमा माणसाला दृष्टी देतो.सिनेमा भान देतो. सिनेमा प्रगल्भ करतो. सिनेमा या कलेकडे आपण सजगतेणे बघायला हवे" असे मत व्यक्त केले. या फिल्म फेस्टीवल च्या यशस्वितेसाठी समन्वयक प्रा.अशोक भोसीकर, प्रा संतोष देशमुख, संजय जाधव, डॉ.रुपेश मोरे, नरेश सोनवणे, प्रशांत शिंदे, लक्ष्मण चादर, नरेंद्र शेजाळ, पंकज शेजाळ, अशोक काळे आदींनी मेहनत घेतली.

## सायबर साक्षरता काळाची गरज - डॉ. भरत शेळके



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा जि. धाराशिव येथे राष्ट्रीय सायबर सुरक्षा सप्ताह दिना निमित राष्ट्रीय सुरक्षा दिवस साजरा करण्यात आला. दि ३० नोव्हेंबर हा राष्ट्रीय सायबर सुरक्षा दिन म्हणून संपूर्ण देशात साजरा करण्यात येत असतो यावेळी एनसीसी विभागाच्या वतीने हा कार्यक्रम महाविद्यालयात घेण्यात आला. राष्ट्रीय सायबर सुरक्षा दिनाबद्दल संगणक शास्त्र विभागाचे डॉ भरत शेळके व्याख्याता म्हणून उपस्थित होते. सर्व कॅडेट व विद्यार्थ्यांना त्यांनी 'सायबर हाइजिन' या विषयावर मार्गदर्शन केले. शेळके यांनी आज अशा अनेक प्रमाणात वाढत चाललेल्या घटना घडत आहेत . अशा फसवणुकी संगणक व मोबाईल द्वारा जास्त होत आहेत . त्यामध्ये आर्थिक, वैयक्तिक ,खाजगी माहिती चोरी,फसवणुक केली जात आहे . यासाठी सर्वांनी या बनावट अॅप्स, लिंक, मॅसेज मोबाईल व संगणक द्वारे जास्त प्रमाणात हॅक केली जात आहे याबदल सर्वांनी सुरक्षित रहावे व सर्व मोबाईलच्या माध्यमातुन व्यक्तिची वैयक्तिक माहिती घेऊन हॅकर स्वतःचा ताबा घेतो त्यांच्या संबंधिताना तो फसवत असतो . याबद्दल सर्वांना संकणाकाची साक्षरता जाणुन घेणे गरजेचे आहे असे सरांनी सांगितले. तसेच आज प्रत्येकाने आपला मोबाईल वापरत असताना विविध फसव्या , बनावट जाहिराती, लिंक, मॅसेज पासून सावध रहावे जर फसवणूक झालीच तर वेळीच राष्ट्रीय, राज्य सायबर सुरक्षा, जवळच्या प्रत्येक पोलिस स्टेशनला किंवा संबंधित यंत्रणेला भेट देऊन किंवा फोनदवारे आपली झालेली फसवणूक कळवून सुरक्षित रहावे असे आव्हान केले.राष्ट्रीय सायबर सुरक्षा जागरूकता महिना म्हणून ऑक्टोबर महिन्यात साजरा केला जातो. या महिन्यात देशभरात सायबर सुरक्षा जागरूकता वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात आणि लोकांना ऑनलाइन सुरक्षित राहण्याबद्दल माहिती दिली जाते.राष्ट्रीय सायबर सुरक्षा ज्याचा उद्देश नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे . यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ संजय अस्वले होते सूत्रसंचलन ,प्रास्तविक कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले यांनी केले आभार कॅडेट प्रमोद सुनगार यांनी केले या कार्यक्रमास डॉ विलास इंगळे, डॉ पदमाकर पिटले डॉ प्रदीप पाटील,प्राध्यापक, कॅडेटस , विद्यार्थी उपस्थित होते .




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ डिसेंबर २०२५


## सावखेड्यात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्याला भावपूर्ण निरोप



सावखेडा (ता. गंगापूर) येथील सामाजिक कार्यकर्ते भारत लालजी बाबुलालजी जयसवाल (वय 74) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले डॉ. योगेश व शीतल, मुली ज्योती, सुवर्णा, छाया तसेच नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे अंत्यसंस्कार सावखेडा येथील स्मशानभूमीत पार पडले. अनेक नातेवाईक, मित्रपरिवार व ग्रामस्थांनी उपस्थित राहून श्रद्धांजली अर्पण केली.


### प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## गीता जयंती निमित्त भराडीत सामान्य ज्ञान परीक्षा



**कन्नड (अरुण थोरात):** हिंदू धर्मियांचा पवित्र धर्म ग्रंथ म्हणून भगवत गीतेस जागतिक स्तरावर मोठे स्थान असून ईतर धर्म व धर्म ग्रंथ आदर स्थानी ठेवत, जीवन जगण्यासाठी लागणारे मूलभूत व योग्य बाबी, मानवता, व्यवहार आदी बाबीसह माणवास आयुष्यात वावरतानि लागणारी योग्य ती आचार संहिता गीतेत अधोरेखित केली आहेत.या सर्व बाबीचा सारासार विचार करून गीतेवर आधारित गीता जयंती निमित्त भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयात सामान्य ज्ञान परीक्षा घेऊन, त्यातील सहभागी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यशवंत विद्यार्थ्यांचे सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम.के.देशमुख, शैक्षणिक संस्था प्रमुख अशोकदादा गरुड यांनी अभिनंदन केले. भक्ती जाधव, गायत्री शिंदे, देवयानी शेजुळ, समृद्धी घडमोडे, रुपाली महाजन, वैष्णवी मुरकुटे, प्राची शिंदे, ऋतुजा चव्हाण, प्राची भोसले, राशी भोसले, मयुरी काकडे, आंचल भोजने, अयोध्या महाजन, सृष्टी जंगले, दीपा आग्रे, श्रद्धा शेजुळ, वैष्णवी साळवे, पूर्वा साखरे, मयुरी सुसुंद्रे, भक्ती काकडे, नम्रता राकडे, अनन्या पाटील, भक्ती बिडवे, मोहिनी चाथे, स्नेहल शिंदे, वैष्णवी बिडवे, खुशी राऊत, प्रांजल सोनवणे, रेणुका जंजाळ, रोहिणी खांदवे, पूनम कोलते, तन्वी महाजन, अनुष्का महाजन, सोहम शिंदे, आदित्य पांडव, सागर महाकाळ, वेदांत काचोळे, वरद आग्रे, कार्तिक शेजुळ, प्रणव निकम आदींचा समावेश होता.

## मी मनीमाऊ

ओळखलं का मला
मी आहे मनीमाऊ
उंदराची पिल्लं
माझा आवडता खाऊ

गुपचूप गुपचूप
घरात मी येते
कुठं काय ठेवलं
याचा कानोसा घेते

अपशकून मानू नका
माझे आडवे जाने
मनातून काढून टाका
अंधश्रद्धेचे रडगाणे

वाघाची मावशी म्हणून
माझी सर्वत्र ख्याती
पण बोबडी वळते
समोर दिसता मोती

चोरून दूध पितांना
पांढरी होते मिशी
पैसे नाही जवळ
पार्लरमध्ये जावू कशी?




- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो. 9011559106


## माझ्या शाळेच्या वाटेला

माझ्या शाळेच्या वाटेला,गोड फणसाच्या बागा
रंगीबेरंगी फुलांनी, कसा बांधलाय धागा

वाटेवर या शाळेच्या, झाडं उभी स्वागतास
ऊन येता डोईवर, देती छाया लेकरास

शाळा माझी सरस्वती,आम्ही तिचेच पुजारी
गुरू पांडुरंग तिथे, तिच आमची पंढरी

अंगणात या शाळेच्या, भरे पाखरांची शाळा
किलबिल चिवचिव, फुलपाखरांचा मळा

गुरू देई लेकरास, इथं जगण्याचं ज्ञान
जसा उगवतो सुर्य, देण्या प्रकाशाचं दान

अशी क्षितिजाच्या पार, माझ्या शाळेची नजर
हिला खेटूनच जाते, वाट हिरवीगार दूर

निळ्या आभाळाच्या खाली,माझी भरतेय शाळा
हिचा लागला आम्हाला, जन्मोजन्मीचा रे लळा




ज्ञानेश्वर गायके,
कन्नड








# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ डिसेंबर २०२५


## मुरूम शहर बनले भाजपमय, कॉर्नर बैठका की विजयी सभा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** नगर परिषद निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मुरूम नगर परिषद निवडणूकीच्या अनुषंगाने भारतीय जनता पार्टीचे नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार "किंगमेकर, राजकारणी चाणक्य" बापूराव पाटील निवडणूक मैदानात उतरले आहेत... ५० वर्षापासूनचा धडाडीचा विकास वाढत्या शहरीकरणाचे वाढते आव्हान याचे दूरदृष्टी डोळ्यासमोर ठेऊन माजी मंत्री तथा भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण जिल्हा अध्यक्ष बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ते निवडणूक मैदानात उतरले आहेत.. मुरूम शहराचा राजकीय इतिहास पाहता या शहरात कॉंग्रेस मय इतिहास राहिला आहे याची सुरवात ही पाटील परिवारातून चैतन्यमूर्ती शिक्षणमहर्षी माधवराव पाटील काका यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली होती, त्यांच्या हयात आणि त्यांच्या पश्चात पाटील परिवाराने सामाजिक सलोखा जोपासत विकासाची घट्ट धरलेली कास त्यांनी कधीच सोडली नाही. सण २०२४ मध्ये माजी मंत्री बसवराज पाटील सह पाटील परिवार भाजप मध्ये प्रवेश केल्यानंतर, शहरातून विविध अपप्रचाराला वाचा फोडून एक हाती सत्ता राबविणाऱ्या पाटील परिवारांच्या विचारांना खिंडार पाडण्याचा सर्वपक्षीय प्रयत्न झाला मात्र ज्यांचे शहर आणि शहरातील नागरिका प्रति त्यांचे असलेले कौटुंबिक प्रेम आणि दृड विश्वासा समोर विरोधकांचे बुरुज आणि त्यांचा मनशुब्याचा चुराडा झाला. पाटील परिवाराने ५० वर्षापासून मुरूम शहरातील नागरिकांना एक परिवाराचा हिस्सा म्हणून दिलेले वागणूक आणि मिळवेलेला विश्वास कायम ठेवण्यात यशस्वी राहिले त्यामुळे येथील नागरिक पाटील परिवाराकडे पाहताना किंवा त्यांच्या सोबत वागताना "राजकीय घरानां म्हणून नाही तर आपल्या कुटुंबातले सदस्य" म्हणून संबोधत असल्याचे समीकरण कायम राहिले.५० वर्षाच्या इतिहासत मुरूम शहरातील सर्व धर्मियांना पाटील परिवाराने नगरपरिषद वर संधी दिली आहे, चैतन्यमूर्ती काका नंतर पुन्हा राजकारणी चाणक्य काका निवडणूकीच्या मैदानात उतरले आहेत, चैतन्यमूर्तीने रचलेला इतिहास, भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून पहिल्यादांच निवडणूकीला सामोरे जाणारे काका इतिहासाची पुनरावृत्ती घडवीण्यासाठी त्याचे मुहूर्तमेड पुन्हा पाटील परिवाराच्या शुभहस्ते करण्यात आली आहे. मुरूम शहरातील सद्याची निवडणूक परिस्थिती पाहता भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमताने पोषक वातावरण निर्माण झाले असल्याचे चित्र दिसून येते अर्थात ५० वर्षानंतर मुरूम शहरात कमळ फुलणार अशी चर्चा जोमाने आणि आत्मविश्वासने चालू आहे. प्रत्येक प्रभागात होणारे कॉर्नर बैठकी पाहता या कॉर्नर बैठका आहेत की विजयी सभा अशी चर्चा आता रंगायला चालू झाले आहेत. माजी मंत्री बसवराज पाटील यांनी कॉर्नर बैठका घेऊन भारतीय जनता पार्टीचे अधिकृत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बापूराव पाटील सह सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे विनंती केली. भाजप युवानेते शरण बसवराज पाटील, सौ. संपदा शरण पाटील, कु. स्मितातार्इ बापूराव पाटील सह पाटील परिवार भाजप उमेदवाराच्या प्रचार्थ पायला भिंगरी बांधून डोर टू डोर झंझावाती प्रचार करत आहेत. ५० वर्षाच्या इतिहासत नागरिकांकडून मिळालेलं प्रेम आणि विश्वासाची पुंजी अद्याप जैसेते शाबूत असल्याची प्रचिती या प्रचारदरम्यान पाहायला मिळत आहे.जणसामान्यांची अडचणीची जान, शहराचे प्रगतीचे दूरदृष्टी,शहरातील कुटुंबातील व्यक्तींना शहराच्या विकासात खंड पडू नये यासाठी पाटील परिवाराचा योगदान राहिला आहे, विरोधकांकडे मत मागण्यासाठी भक्कमपणे मुद्दे कोणते सापडत नसल्याने अपप्रचार, एकमेकांना पाठींबा देऊन सर्व शक्ती एक करून लढा देत आहेत आणि ही मुरूम शहराची पूर्वीपासूनचे प्रथा, परंपरा आहे यात वेगळे असे काही नाही...शेवटी ३ तारखेला दूध का दूध पाणी का पाणी होणारच आहे, कॉर्नर बैठकाची तुफान गर्दी पहाता ही कॉर्नर बैठक नसून विजयी सभा असल्याचे चर्चा नागरिकांतून होत आहे.हलगीचा नाद,फटाकाड्याची अतिशबाजी, फुलबाज्याच्या प्रकाशने जागोजागी जंगी स्वागत हे पाटील परिवाराने ५० वर्षाची शहराला दिलेली सेवेची पावती दर्शवीत आहे, काका, साहेब आणि पुन्हा काका या नावतच शहरातील नागरिकांचा वैचारिक ऐतिहासिक पाया भक्कम झाले असल्याचे प्रचिती या निवडणूकीत मुरूमकरांना पाहायला मिळत आहे, ५० वर्षे सर्वधर्मियांना नगर परिषद वर संधी दिली आणि आता स्वतः साठी संधी मागितली यात गैर काय अशी चर्चा ही आता नागरिकांतून रंगत आहेत, शहरावर अफार प्रेम आणि विश्वास ठेऊन पाटील परिवाराने केलेले कार्य आणि त्यांचे शहरासाठीचा योगदान, भ्रष्टाचार रहित राजकारण पाहता नागरिकांतून ही त्यांना तेच प्रेम आणि विश्वास संपादीत करण्यात यश आले आहे आणि हे असेच अबाधित राहील असं दृड विश्वास मुरूमकरांनी पुन्हा दाखवून दिली आहे

## देवराव मरबे यांची सैन्यदलात निवड




**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय मुरूम येथील सन २०२२-२३ मधील विज्ञान शाखेचा माझी विद्यार्थी देवराव मरबे राहणार आलुर याची भारतीय सैन्यदलात ट्रेडमन म्हणून निवड झाल्यानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांच्या हस्ते त्याचा सत्कार करून सैन्यदलातील सेवेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य गोविंद इंगोले यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करत असताना देवराव मरबे ग्रामीण भागातील होतकरू विद्यार्थी जिद्द चिकाटी व मेहनतीच्या जोरावर स्वकर्तुत्ववाने यशाचे शिखर गाठले आहे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रेरणा घ्यावी व भारत देशाची सेवा करण्यासाठी आपणही प्रयत्न करावे असे मत व्यक्त केले यावेळी महाविद्यालयातील प्रा. राठोड एस. बी., प्रा. उपासे जी. डी., प्रा. इंगोले बी. आर., प्रा. हराळकर आर. व्ही., प्रा. चौगुले, प्रा. चौधरी, प्रा. कांबळे, प्रा. चिकुंद्रे, प्रा. चव्हाण, प्रा. इंगळे, प्रा. शिंदे, श्री गुरव, अनिकेत सगट हे उपस्थित होते.

## मराठी विषयाचे वर्धा जिल्हाध्यक्ष प्राध्यापक गिरीश खाडे यांची आयडियल शिक्षक निवड



**जालना (प्रा.राजेंद्र सोनवणे) :** कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघाचे वर्धा जिल्हा अध्यक्ष आणि उपक्रमशील शिक्षक म्हणून वर्धा जिल्हा आणि नागपूर विभागात ज्यांची ख्याती आहे असे प्रा. गिरीश काळे यांची वर्धा जिल्ह्यातून महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयडॉल शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल महासंघाच्या वतीने व सर्व जिल्हा अध्यक्ष, महाराष्ट्रातील सर्व मराठी विषय शिक्षकांनी त्यांचेअभिनंदन व कौतुक केले आहेमराठी विषय राज्य महासंघाचे अध्यक्ष प्रा. सुनील डिसले (बारामती) *कार्याध्यक्षा*- *डॉ. मनीषा रिठे (हिंगणघाट) सचिव - प्रा. बाळासाहेब माने (मुंबई)*राज्य समन्वयक प्रा डॉ.राजेंद्र सोनवणे तसेच *सर्व राज्यकार्यकारिणी, जिल्हा व तालुका प्रतिनिधी कनिष्ठ महाविद्यालयीन मराठी विषय शिक्षक महासंघ, महाराष्ट्र राज्य,यांच्यातर्फे त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

साहिल
कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

# तपोवनचा हुंकार

तपोवनाची माती रडली, झाडांवरचे घाव रे
अठराशेची हाक द्यायला, तापे जनतेचा श्वास रे
झाडांवरी झडप घाली, सत्तेची ही मंडळी ढोंगी रे
नाशिकच्या या मातीतूनी, उठला संताप रे ॥१॥

कुंभमेळा मोठा म्हणती, पण श्वासच मोठा रे
झाडं जगाला जीव देत, तोडणं पापाचा डोह रे
झाडांनीच पुण्य मिळे, झाडांनीच पाप धुऊनी जाई
कोंब तोडून करतात दान?— कसली ही भक्ताई? ॥२॥

तेव्हाच उभा निरंजन झाला, रानातल्या वणव्यासारखा
“दुश्मनी येऊ दे काय, झाडांसाठी उभा सिंहाचा!”
सत्तेची पायरी भारी, पण धीर त्याचा झाडांत उगवे
पानापानाची माय त्याला, मन त्याचं झाडांत रुतवे ॥३॥

गिरीशांशी कसली वैरं?— नाही कुणाशी राडाबाबी
झाडांच्या या जखमांशी, रक्ताची त्याची जोड जुनी
“साधू येती-जातील रे”, झाडं गेली तर हानी मोठी
नाशिकचा हा हुंकार वाढे, ज्वाळा जशा वणव्यात उठती ॥४॥

निरंजन पुढं रणांगणी, मागं जनतेचा हुंकार
झाडांच्या या धडधडीत, पेटला जसा ज्वाळांचा भार
एक उभा पुढं दिसावा, उमेदीचा वारा पाठी
झाडांसाठी जीव ओताया, जनता उतरली रणपाठी ॥५॥

ट्रोलधाडी भुंकू देत रे, रानगवा नाही मागं हटत
झाडांच्या या जिवलागी रणात, लढवय्यांचा ज्वारी धावत
निरंजन सत्वशपथ पेटली, जनता उभी छाती ठोक
“एकटा कुणी पडणार नाय”, नाशिकचा निर्धार दणदणत ॥६॥

चला उभे राहू मागे तयाच्या, झाडांच्या नावाचा जयघोष
झाडं म्हणजे घरदार आपलं, त्यांची सावलीच खरा प्रकाश
तपोवनात उठला गजर, “झाडं वाचवा” जोरात हुंकार
नाशिकचा हा जनअभंग, झाडांसाठी पेटलेला अखंडदिवस ॥७॥

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

# जागतिक एड्स दिनानिमित्त शिवाजी महाविद्यालयात रेड रिबन क्लब तर्फे रॅलीचे आयोजन




**कन्नड :** महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी व जिल्हा एड्स प्रतिबंध पथक जिल्हा रूग्णालय (डापकु) औरंगाबाद तसेच ग्रामीण रुग्णालय कन्नड तर्फे एड्स जनजागृती निमित्त जनजागृती फेरी दि. १-१२-२०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती त्यानिमित्त शिवाजी कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय कन्नड रेड रिबन क्लब, एन.सी.सी.,एन.एस. एस. विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.सर्व प्रथमग्रामीण रुग्णालय कन्नड येथील वैद्यकीय समुपदेशक श्री. सोनवणे यांनी जनजागृतीपर विद्यार्थ्यांना शपथ दिली आणि मार्गदर्शन केले. उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर ह्यांनी रॅली ला मार्गदर्शन केले आणि हिरवा झेंडा दाखवून सुरुवात केली. या प्रसंगी रेड रिबिन क्लब समन्वयक डॉ. पी. के. संघई, डॉ. अहिरराव, एन. सी. सी. प्रमुख डॉ. मातकर डॉ. साखरे विद्यार्थी रोहित क्षीरसागर कु. मयुरी पवार अदनान पठाण तसेच या प्रसंगी एन. सी. सी. विद्यार्थ्यांनी मानवी साखळी करून जनजागृती केली. ह्या रॅलीमधे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येत सहभाग घेतला. जागतिक एड्स दिन निमित्त विविध उपक्रम राबविण्यास महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही.एन. भोसले राज्य एड्स नियंत्रण पथक मुंबई तसेच जिल्हा शल्य चिकित्सक मा.डॉ कमलाकर मुदखेडकर जिल्हा समन्वयक साधना गंगावणे ग्रामीण रुग्णालय कन्नड येथील वैद्यकीय अधीक्षक मा. डॉ. अनिरुद्ध गायकवाड श्री. सोनवणे श्री. शशिकांत गांगूर्डे यांच्यासह सर्व कर्मचारी ह्यांचे सहकार्य मिळाले.

# महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठात संविधान दिवस उत्साहात साजरा







**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, कांचनवाडी संभाजीनगर येथे दिनांक 26/11/2025 रोजी संविधान दिवस साजरा करण्यात आला. सर्व प्रथम विद्यापीठच्या कुलगुरु मा.डॉ. बिंदु एस. रोनाल्ड व कुलसचिव मा. डॉ धनाजी जाधव यांनी आपल्या भारताच्या संविधान पुस्तकाचे पुजन करुन पुष्पहार अर्पण केले. त्यानंतर विद्यापीठाच्या कुलगुरु मा.डॉ. बिंदु एस. रोनाल्ड यांनी आपल्या भाषणमध्ये असे संबोधीत केले की, आपल्या भारताचे संविधान हे भारताचे सर्वोच्च कायदेशीर दस्तऐवज असून जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे. सदरील संविधान हे एक सरकारी संस्थांच्या मूलभूत राजकीय संहिता, रचना, कार्यपद्धती, अधिकार आणि कर्तव्ये यांचे सीमांकन करणारी चौकट मांडते व त्यानुसार नागरिकांचे मूलभूत हक्क व कर्तव्ये व त्यांचे अधिकार आणि मार्गदर्शक तत्त्वे निश्चित करते तेव्हा आपण सर्वांनी संविधानाचा आदर केला पाहिजे.त्यानंतर विद्यापीठाचे कुलसचीव मा. डॉ धनाजी जाधव यांनी त्यांच्या भाषणामध्ये असे संबांधीत केले की, संविधान हा भारताचा सर्वोच्च कायदा आहे. हा दस्तऐवज मूलभूत राजकीय संहिता, संरचना, कार्यपद्धती, अधिकार आणि सरकारी संस्थांची कर्तव्ये आणि मुलभूत अधिकार, मार्गदर्शक तत्त्वे आणि नागरिकांची कर्तव्ये निर्धारित करणारी चौकट असून हे जगातील सर्वात मोठे लिखित राष्ट्रीय संविधान आहे.संविधानाने भारताता सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, आणि लोकशाही प्रजासत्ताक घोषित केल्यामुळे व त्यानुसार भारतातील सर्व धर्माच्या नागरिकांना न्याय, समानता आणि स्वातंत्र्याची हमी देत असून सामाजिक बंधुत्वाला प्रोत्साहन देण्याचे कार्य करीत आहे.कार्यक्रमाची रुपरेषा प्रा. डॉ. शिरिष कुलकणी यांनी मांडली तसेच संविधाना विषयी मोलाची माहिती देऊन. त्यातील कर्तव्ये अंगीकारण्यासाठी सर्वांना प्रेरित केले. तसेच विद्यापीठाचे Legal Aid Clinic चे विद्यार्थी श्री. उमेश साळवे व कु.

पुजा वायचळ यांनी मनोगत व्यक्त केले. सदरील कार्यक्रमाला विद्यापीठाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. आभार प्रदर्शन प्रा. डॉ. शिरिष कुलकर्णी यांनी व्यक्त करुन मान्यवरांच्या अनुमतीने कार्यक्रम समाप्ती जाहीर केली.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# मानवमुक्तीचा दीर्घ संघर्ष: आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व- डॉ. राजेंद्र बगाटे

दि. 2 डिसेंबर हा दिवस मानवसभ्यतेच्या इतिहासातील सर्वात काळ्या अध्यायाला आणि त्यावरील संघर्षाला उजाळा देणारा दिवस आहे. "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" हा केवळ एक स्मरणदिन नाही, तर आजही जगभर वेगवेगळ्या स्वरूपात जिवंत असलेल्या आधुनिक गुलामगिरीविरोधातील लढ्याचे प्रतीक आहे. इतिहासाच्या पानावर गुलामगिरी जणू काही भूतकाळातील घटना आहे असे आपल्याला वाटत असले तरी वास्तविकता अतिशय कठोर आहे. आजही जगात लाखो लोक अद्याप गुलामगिरीच्या अंधाऱ्या चक्रात अडकलेले आहेत. मानव सभ्यतेने विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान व लोकशाही सरकारव्यवस्था यांसारख्या क्षेत्रांत अमाप प्रगती केली आहे, परंतु मानवाधिकार, मानवी प्रतिष्ठा आणि समानतेच्या दृष्टिकोनातून पाहता गुलामगिरीचे अनेक स्वरूप आजही समाजाच्या पृष्ठभागाखाली धुमसत आहेत.इतिहासात गुलामगिरी ही केवळ आर्थिक मालकीची व्यवस्था नव्हती, तर सत्ता, वर्ण, धर्म, जात, भौगोलिक वंश आणि सामाजिक वर्चस्व यांच्या आधारावर उभी केलेली एक अमानवी संघटना होती. प्राचीन इजिप्त, रोम, ग्रीस, बाबिलोनिया किंवा भारतातील सामंतशाही काळातील शूद्र व दलितांवरील वागणूक असो यामध्ये सर्वत्र गुलामगिरीचे स्वरूप दिसून आले आहे. परंतु मध्ययुगीन वसाहतवादाने या व्यवस्थेला अधिक क्रूर रूप दिले. विशेषतः आफ्रिकन लोकांना पकडून अमेरिकन देशांत विकण्याची मानवी तस्करी ही इतिहासातील सर्वात क्रूर आणि अमानवी आर्थिक व्यवस्था होती. लाखो लोकांना जबरदस्तीने जहाजांत भरून गुलाम म्हणून विकले गेले, त्यांच्या कुटुंबांना विभक्त केले गेले, त्यांची ओळख, भाषा, संस्कृती, तसेच मानवी अस्तित्वच हिरावून घेतले गेले. मानवाला पशूपेक्षाही कनिष्ठ गणले गेले. आज आफ्रिकन-अमेरिकन समाजात दिसणारे जातीय विभाजन आणि सामाजिक विषमता हा त्या वसाहतवादी गुलामगिरीचा दाहक परिणाम आहे.गुलामगिरीविरोधी चळवळीने जगभरात मानवाधिकारांची आणि सामाजिक समानतेची नवी लाट निर्माण केली. 19व्या शतकात ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिकेसह अनेक राष्ट्रांनी गुलामगिरीविरोधात कायदे केले आणि अखेर संयुक्त राष्ट्रांनी 2 डिसेंबर 1949 रोजी 'Forced Labour Convention' ला मान्यता देऊन गुलामगिरी निर्मूलन करून जागतिक लढा औपचारिक केला. 1985 पासून ही तारीख "आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिन" म्हणून साजरी केली जात आहे. हा दिवस मानवजातीच्या इतिहासातील एक जागृतीचे प्रतीक ठरतो, जो सांगतो की मानवी स्वातंत्र्य हे कोणत्याही राष्ट्राचे नव्हे तर संपूर्ण मानवजातीचे मूलभूत अस्तित्व आहे.परंतु आजही खऱ्या अर्थाने गुलामगिरी नष्ट झालेली नाही. संयुक्त राष्ट्रांच्या ताज्या अहवालानुसार जगात अद्याप 50 ते 55 दशलक्ष लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. ही गुलामगिरी रूप बदलून समाजात खोलवर रुजलेली आहे. आज गुलामगिरीचे आधुनिक स्वरूप अधिक गुंतागुंतीचे, अदृश्य आणि तंत्रज्ञानाच्या आधारे सक्रिय आहे. मानव तस्करी, बालमजुरी, सक्तीची मजदुरी (Bonded Labour), जबरदस्तीचे विवाह, लैंगिक गुलामगिरी, अवयव व्यापार, सायबर सेक्स ट्रॅफिकिंग, ऑनलाइन पेड चाइल्ड अब्यूज, घरगुती नोकरांचे शोषण, स्थलांतरित कामगारांचे आर्थिक गुलामीकरण या सर्व आधुनिक गुलामगिरीच्या व्याख्या आहेत.विशेषतः महिला आणि मुली या गुलामगिरीचे सर्वात मोठे बळी आहेत. बालविवाह, हुंडा, आर्थिक अवलंबित्व, शिक्षणापासून वंचितता आणि लैंगिक शोषणामुळे त्यांना गुलामगिरीच्या दलदलीतून बाहेर येणे कठीण होते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले तर गुलामगिरी ही केवळ व्यक्तीगत हिंसाचाराची घटना नाही; तर ती संरचनात्मक हिंसा आहे. समाजातील वर्ग, वर्ण, जात, लिंग आणि सत्ता यांच्या विषमतेतून गुलामगिरी जन्म घेते. समाज जर असमान, अन्यायकारक आणि सत्ताकेंद्रित असेल तर गुलामगिरी आपोआप वाढीस लागते.भारताच्या संदर्भात पाहिले तर गुलामगिरीचे स्वरूप ऐतिहासिकदृष्ट्या जातिव्यवस्थेच्या आधारावर रचले गेले. दलित, भटके विमुक्त समाज, आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित समुदायांवर शतकानुशतके स्वयंपूर्णतेचा अधिकार हिरावून घेतला गेला. आजही भारतात बंधकाम मजूर, ईंटभट्ट्या, कारखाने, शेती, मत्स्यउद्योग आणि बांधकाम क्षेत्रात लाखो लोक आधुनिक गुलामगिरीचे बळी आहेत. भवानी मंडईतील कर्जावर काम करणारे शेतमजूर, घरकामगार, देवदासी प्रथा, तस्करीला बळी पडलेल्या महिला आणि मुली, तसेच बालमजुरीमध्ये अडकलेली मुलं ही उदाहरण या समस्येची गंभीरता दर्शवतात.जागतिकीकरण आणि भांडवलशाहीने श्रमबाजाराला अधिक असुरक्षित केले आहे. मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या स्वस्त मजुरीच्या शोधात गरीब देशांतील लोकांना शोषतात. त्यामुळे "Consumption-based slavery economy" हा शब्द आज वापरला जातो, ज्याचा अर्थ असा की ग्राहकांनी वापरलेल्या वस्तूंच्या निर्मितीत गुलामांचं श्रम सामील असतं. फॅशन उद्योगातील "Fast Fashion", खनिज उत्खनन उद्योग, साखर, चहा, कोको, हिरे आणि इलेक्ट्रॉनिक उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेत मानवाधिकारांचे उल्लंघन सर्वाधिक आढळते.या परिस्थितीत माध्यमं, शिक्षण, कायदे आणि मानवी हक्क चळवळींची भूमिका महत्त्वाची ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना (ILO), Amnesty International, UN Human Rights Office of the High Commissioner, Anti-Slavery International, Free the Slaves सारख्या अनेक संस्थांनी आधुनिक गुलामगिरीविरोधात लढा पुकारला आहे. अनेक देशांनी कठोर कायदे केले परंतु कायद्यापेक्षा सामाजिक जागृतीची कमतरता ही या समस्येचे महत्त्वाचे कारण आहे."गुलामगिरी" या शब्दात केवळ बळजबरी, हिंसा, शोषण एवढाच अर्थ नाही, तर त्यात मानवी प्रतिष्ठेचा पूर्ण नाश दडलेला आहे. समाजशास्त्रातील विचारवंत कार्ल मार्क्स गुलामगिरीला आर्थिक शोषणाचे सर्वोच्च स्वरूप मानतात, तर मॅक्स वेबर यांच्या मते ती सत्ता आणि सामाजिक वर्चस्वाचा सर्वात गुंतागुंतीचा चेहरा आहे. अमर्त्य सेन यांचे मानव-विकास मॉडेल सांगते की स्वातंत्र्य, निवड आणि संधी हे मानवाला उपलब्ध करणेच खरी विकास प्रक्रिया आहे; आणि जिथे गुलामगिरी आहे तिथे विकास असूच शकत नाही.21व्या शतकात गुलामगिरी निर्मूलनाची दिशा ही केवळ कायदेशीर कारवाई नसून ती मानवी संवेदनशीलता, शिक्षण, सामाजिक मूल्यव्यवस्था व आर्थिक समतेचा बदल असायला हवा. आपण समाजाच्या पटलावर असे वातावरण निर्माण केल्याशिवाय गुलामगिरी नष्ट होणार नाही जिथे प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या श्रमाचे, स्वातंत्र्याचे आणि अस्तित्वाचे मूल्य आहे.आजचा दिवस आपणास हा प्रश्न विचारायला भाग पाडतो की "मानव मुक्त आहे का?" जर समाजात कुणी आर्थिक गरजेमुळे स्वतःला विकत असेल, कुणी जात किंवा वर्णामुळे अपमानित होत असेल, कुणी युद्धामुळे विस्थापित होत असेल किंवा कुण्या मुलाचे बालपण चोरले जात असेल तर मानव सभ्यतेने अजूनही स्वातंत्र्याची खरी व्याख्या गाठलेली नाही.आंतरराष्ट्रीय गुलामगिरी निर्मूलन दिनाचे खरे सार असे आहे की जगात कुठेही, कोणत्याही स्वरूपात गुलामगिरी असेल तर मानवजात अद्याप परिपूर्ण झाली नाही. स्वातंत्र्य, समानता आणि मानवाचे जीवनमूल्य हे सार्वत्रिक आहेत. ते कोणत्याही राष्ट्राचे, धर्माचे, जातिचे किंवा शासनप्रणालीचे नसून संपूर्ण मानवजातीचे आहेत.सर्वांनी मिळून हे ठरवले पाहिजे की गुलामगिरीचा शेवट हा इतिहासाचा भाग नव्हे, तर वर्तमानातील ध्येय असले पाहिजे. कारण जिथे मानवाला स्वातंत्र्य नाही, तिथे प्रगती नाही; आणि जिथे समानता नाही, तिथे मानवता नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. 9960103582
bagate.rajendra५@gmail.com

**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०२ डिसेंबर २०२५

# घटनात्मक पेच असताना सर्वोच्च न्यायालया समोर सुनावणी दिशा देईल काय ? डॉ राजेंद्र दाते पाटील



**प्रतिनिधी(दिल्ली)** ओबीसी आरक्षण 50% मर्यादाचे उल्लंघन ठरले त्यावर नुकताच एक निकाल सर्वोच्चन्यायालयाने दिला असुन घटनात्मक पेच असताना सर्वोच्च न्यायालया समोर सुनावणी दिशा देईल काय ? या कडे सर्वांचे लक्ष लागून असल्याचे मत सर्वोच्च न्यायालयातील मराठा समाजा च्या वतीने असणारे मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ता व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त करून पुढे ते म्हणाले की,या निकालाने 10 टक्के एस इ बी सी कडे संकेत दिलेले असुन हे घटनात्मक संकेत गंभीर्याने घ्यावे लागतील असेही ते म्हणाले.या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात वकिलाचे म्हणणे ऐकल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने पुढील आदेश दिले की,नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुका अधि सूचित वेळापत्रकानुसार होऊ शकतात तथापि,हे स्पष्ट करण्यात आले की ज्या 40 नगर पालिका व 17 नगर पंचायती मध्ये आरक्षण 50% मर्यादेचे उल्लंघन करते,त्यांचा निकाल या कार्यवाहीच्या अंतिम निकालावर अवलंबून असेल. दोन मनपा मध्ये 50% पेक्षा जास्त आरक्षणे आहेत,असे असताना न्यायालयाने निर्देश दिले की, महानगर पालिकांच्या निवडणुका देखील कोणत्याही विलंब न करता अधिसूचित केल्या पाहिजेत आणि त्या लवकरात लवकर घेतल्या पाहिजेत.ज्या दोन महानगर पालिकांमध्ये आरक्षण 50% पेक्षा जास्त आहे त्यांचा निकाल या कार्यवाहीच्या अंतिम निकालावर अवलंबून असेल असे न्यायालयाने जरी म्हंटले असले तरी या पूर्वीच घटना पीठाने या बाबत स्पष्ट निर्णय दिलेला असताना देखील परत सुनावणी घेण्यामागची नक्की भूमिका समजावून घेण्याची गरज असल्याचे मत आरक्षणाचे जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले. पुढे ते म्हणाले की,शेवटी, 32 जिल्हा परिषदा आणि 336 पंचायत समितींच्या बाबतीत, असे निर्देश दिले जातात की जिथे आरक्षण 50% पेक्षा जास्त नसेल,तिथे सर्वोच्च न्यायालया च्या मागील आदेशां नुसार निवडणुका घ्याव्यात असे निर्देश दिले आहेत. पुढील सुनावणी आता 09 जानेवारी 2026 महाराष्ट्रात बांठिया समर्पित आयोग ही एक सहा सदस्यांची समिती होती, ज्याचा अध्यक्षपद माजी मुख्य सचिव जयंत कुमार बांठिया यांच्या अध्यक्षते खाली आयोगाची स्थापना 11मार्च 2022 रोजी करण्यात आली. त्यांनी 7 जुलै 2022 पर्यंत सतत कार्यरत राहून कार्य केले, या समर्पित आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांतील ओबीसींचे सामाजीक- आर्थिक आणि राजकीय स्थितीचे सर्वेक्षण केले. बांठिया समर्पित आयोगाने महापालिका,जिल्हा परिषद, नगरपालिका, पंचायत समिती क्षेत्रातील ओबीसी मतदार आणि लोकप्रतिनिधींची माहिती राज्य निवडणूक आयोग आणि संबंधितांकडून गोळा केली. मतदार यादीतील आडनावांच्या आधारावर ओबीसींची संख्या आणि लोकसंख्या विषद केली. या समर्पित आयोगाने शेकडो पानांचा अहवाल तयार करून राज्य सरकारला सादर केला आणि तो नंतर सर्वोच्च न्यायालयात देखील सादर करण्यात आला.या आयोगाचा मुख्य हेतू महाराष्ट्रात स्थानिक निकायांमध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण मिळावे यासाठी शास्त्रीय आकडेवारीवर आधारित निर्णय देणे होते. या माध्यमातून ओबीसींचे स्थानिक स्वराज्यात आरक्षण सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. बांठीया समर्पित आयोगाच्या मुख्य शिफारसी ओबीसींना अनुसूचित जाती- जमातींच्या आरक्षणाला धक्का न लावता 50 टक्के मर्यादेत 27 टक्के आरक्षण द्यावे, जिथे एससी-एसटीचे प्रमाण 50 टक्क्यांहून अधिक असेल तिथे ओबीसी आरक्षण टाळावे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका) निहाय ओबीसींची लोकसंख्या, उपलब्ध जागा व आरक्षण टक्केवारीचे स्वतंत्र तक्ते तयार करावीत. ओबीसींच्या राजकीय मागासले पणा साठी इम्पिरिकल डेटा (शास्त्रीय आकडेवारी) गोळा करून ट्रिपल टेस्टची पूर्तता करावी महाराष्ट्रातील बांठिया समर्पित आयोगाचा गठन 11 मार्च 2022रोजी करण्यात आला होता. या आयोगाची स्थापना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींना (इतर मागासलेल्या जातींस)सामाजीक आर्थिक आणि राजकीय आरक्षणाच्या संदर्भात शास्त्रीय आधारावर तपासणी करण्या साठी करण्यात आली होती.या समर्पित आयोगाचा मुख्य हेतू स्थानिकनिकायां मध्ये ओबीसीं च्या योग्य आरक्षणासाठी आकडेवारी गोळा करणे आणि त्यानुसार शिफारसी करणे हा होता.यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेतील ओबीसींची संख्या, त्यांच्या मतदारांची माहिती, लोकसंख्या त्यांचे सामाजीक- आर्थिक स्थिती यांचे सर्व साधारण सर्वेक्षण प्रमुख होते, ज्यामुळे ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नाचं निराकरण करता यावं असे ठरवलं गेलं होते13 जुलै2022 इतरमागासवर्गीय समाजाला राज्यात आरक्षण देण्यासंदर्भात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या बांठिया समर्पित आयोगाने त्यांचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाला सादर केला. ओबीसी आरक्षण प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी संपन्न झाली.यासुनावणी पूर्वीच आयोगाने त्यांचा अहवाल सादर केला होता.ओबीसींची लोकसंख्या 40% पर्यंत असल्याचा निष्कर्ष काढून माजी मुख्य सचिव जयंतकुमार बांठिया यांच्या समर्पितआयोगाने 27 टक्के आरक्षणास हिरवा कंदील दाखवला होता.मात्र, ओबीसींची लोकसंख्या 52% च्या आसपास असल्याचे मानले. ओबीसी संख्येचा निष्कर्ष हेतु पूर्वक- एसइबीसी आरक्षणाचा वचपा काढण्याचा डाव ! ओबीसी संख्या नव्याने काढण्यात आल्याने नव्या वादाला तोंड फुटण्याचे संकेत आम्ही तेव्हाच दिले होते आणि ओबीसी संख्येचा निष्कर्ष हेतु पूर्वक असुन एसइबीसी आरक्षणाचा वचपा काढण्याचा डाव असल्याचे स्पष्ट होत असुन दरम्यान,राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसीची संख्या आणि राजकीय मागासलेपण यावर आधारित जयंतकुमार बांठीया यांचा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला होता. या प्रकरणी नुकतीच सुनावणी संपन्न झाली आहे. या सुनावणीमध्ये जर राज्यात ओबीसीची संख्या जास्त आहे हे सिद्ध होते काय? अन्यथा ओबीसी आरक्षण कायम स्वरुपी विवादात येणार अशी सामान्यता चर्चा होती.त्यामुळे या सुनावणी कडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले होते. दरम्यान बांठिया समर्पित आयोगाने विभाग निहाय सुनावण्या घेतल्या होत्या,संस्था व व्यक्तींशी, राजकीय पक्षांशी चर्चा केली,सर्वेक्षणे केली.त्या वेळी ओबीसींना 27% राजकीय आरक्षण देण्याची मागणी एकमुखाने करण्यात आली होती. त्यामुळे या समाजाला मुख्य प्रवाहा बरोबर आणण्या साठी आरक्षण देणे गरजेचे असल्याचे समर्पित आयोगाने अहवालात म्हटले होते आणि तिथेच एसइबीसी 10% आरक्षणा विरोधात सक्षम असा डाव रचला गेल्याचे मत मराठा समाजाच्या वतीने सर्वोच्च न्यायालयात असणारे मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ता व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त आहे. ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती अजय खानविलकर यांच्या अध्यक्षते खालील त्रिसदस्यीय पीठापुढे सुनावणी झाली व इम्पिरिकल डेटा तयार केल्याशिवाय ओबीसींना राजकीय आरक्षण देता येणार नाही,असा निर्णय देत यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने ओबीसींचे राजकीय आरक्षण स्थगित केले होते.त्यामुळे शास्त्रीय सांख्यिकी अहवाल तयार करण्यासाठी बांठिया समर्पितआयोगाची नियुक्ती राज्य सरकारने केली होती. आयोगाने आपला अहवाल ग्राम विकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजेशकुमार यांच्या कडे सादर होता.तत्कालीन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सूचनेनंतर हा अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर करण्यात आला होता.सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाने एकूण आरक्षणासाठी 50 टक्क्यांची कमाल मर्यादा निश्चित केली आहे.त्यामुळे ज्या ठिकाणी अनुसूचित जाती,जमाती किंवा आदिवासी समाजाची लोक संख्याअधिक आहे,तेथे 50%ची मर्यादा पाळताना ओबीसींना 27 टक्क्यां पेक्षा कमी आरक्षण द्यावे लागणार आहे.बांठिया समर्पित आयोगाने महापालिका, जिल्हा परिषद आदी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रनिहाय मतदार यादी तील मतदारांच्या आडनावां वरून ओबीसीं ची संख्या निश्चित केली होती हे विशेष होय. विशेष म्हणजे यापूर्वी मंडल आयोगाने राज्यात 54 टक्के ओबीसी लोकसंख्या असल्याचे निश्चित करून त्याच्या निम्मे म्हणजे 27 टक्क्यां पर्यंतचे आरक्षण दिले होते.आता प्रथमच स्थानिक स्वराज्य संस्था निहाय ओबीसींची लोकसंख्या व मतदार संख्या निश्चित झाल्याने जेथे 30-40 टक्के ओबीसींची संख्या आहे, तिथेही 27 टक्के आरक्षण द्यायचे की त्याच्या निम्मे द्यायचे,या मुद्दयावर वाद होण्याची शक्यता निर्माण झाली होती. आश्चर्यकारक रित्या राज्यात 1994 नंतर ओबीसींना आरक्षण लागू झाल्यापासून एकही ओबीसी मुख्यमंत्री झाला नसल्याने हा समाज राजकीय दृष्ट्य़ामागास असून, त्यांना आरक्षण देणे गरजेचे असल्याचे विवेचन करीत बांठिया समर्पित आयोगाने राजकीय आरक्षणाचे समर्थन केलेले आहे.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या 50 टक्के मर्यादेच्या आत राहून अनुसूचित जाती- जमातींना आरक्षण दिल्यावर ओबीसींना 27 टक्क्यांपर्यंत आरक्षण द्यावे आणि जिथे अनुसूचित जाती- जमातींचे प्रमाण 50 टक्क्यांहून अधिक आहे, तिथे ओबीसींना आरक्षण देऊ नये,अशी समर्पित शिफारस आयोगाने केली होती. मंडल आयोग आणि त्यानंतरच्या काळातील सर्वेक्षणा नुसार ओबीसींची लोकसंख्या 52 ते 54 % असल्याचे मानले जात होते. मात्र,आता ही लोकसंख्या 40% पर्यंत असल्याचा निष्कर्ष आयोगाने अनेक सर्वेक्षणांचा अभ्यास करून काढल्याने त्यावरुन वाद निर्माण होण्याची चिन्हे आहेत.स्थानिक स्वराज्य संस्था निहाय राजकीय मागासले पणा बाबत शास्त्रीय सांख्यिकी तपशील (इंपिरिकल डेटा) तयार केल्या शिवाय ओबीसींना राजकीय आरक्षण देता येणार नाही,असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिल्यावर राज्य सरकारने हा तपशील तयार करण्यासाठी बांठिया समर्पित आयोगाची नियुक्ती केली होती. महत्वाचे म्हणजे या आयोगाने काही महिन्यां मध्ये वेगवेगळी सर्वेक्षणे,आकडेवारीचा अभ्यास करून आणि राज्य सरकारच्या यंत्रणेने मतदार यादीतील आडनावां वरुन ओबीसींच्या लोकसंख्येची गणना केली. त्यानंतर बांठिया समर्पित आयोगाने शेकडो पानांचा अहवाल राज्य सरकारला सादर केला व तो नंतर न्यायालयात सादर करण्यात आला होता. मतदार यादीतील आडनावां वरुन केलेल्या गणनेवरुन राज्यातील ओबीसींची लोक संख्या 37 टक्के असल्याचे दिसून आले आहे.राष्ट्रीय सांख्यिकी सर्वेक्षणानुसार ओबीसींची लोकसंख्या 39.7 टक्के इतकी आहे.शिक्षण विभाग आणि अन्य खात्यांच्या सर्वेक्षणा नुसारही ओबीसींची लोकसंख्या याच प्रमाणात असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्यात ही लोकसंख्या 27% हून अधिक आणि 40% असल्याचा निष्कर्ष काढून आयोगाने 27 % आरक्षण देण्याची शिफारस राज्य शासनाला केली आहे तेव्हाच आम्ही नमुद केले होते की समर्पित आयोग ठाम पणे आपले मत का नोंदवत नाही ? एसइबीसी 10% आरक्षणा विरोधात एक सक्षम डाव रचला जात आहे.आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय ओबीसींची लोकसंख्या,उपलब्ध जागा, अनुसूचित जाती-जमातींची लोकसंख्या आणि आरक्षणाच्या 50%च्या मर्यादेत ओबीसींना किती टक्के जागा देता येतील, अशी शिफारस स्वतंत्र तक्ते करून राज्य सरकार आणि न्यायालयास केली आहे. त्यानुसार जिथे अनुसूचित जाती- जमातींची लोकसंख्या 20 टक्के आहे, तेथे 27 टक्क्यां पर्यंत आरक्षण देता येईल.जिथे ओबीसींची लोकसंख्या 27 टक्क्यांहून कमी आहे, तेथे त्या लोकसंख्येच्या टक्केवारी इतके म्हणजे 24 % पर्यंतही देता येईल, अशी शिफारस आयोगाने केली आहे. 50% मर्यादा ओलांडण्याचा अधिकार राज्यास नसतानाही हा आट्टाहास कोणासाठी ? नागपूर मनपाची स्थिती लक्षात घेतली तर आरक्षणाची पुनर्रचना करावी लागू शकते नागपूर मनपात 151 जागांपैकी 50 टक्के म्हणजे 75 जागांचे आरक्षण अपेक्षित होते.मात्र, प्रत्यक्षात 82 जागांचे आरक्षण काढण्यात आले.यात ओबीसीं साठी 40,अनुसूचित जातींसाठी 30 आणि अनुसूचित जमातीं साठी 12 जागांचा समावेश आहे.तर नागपूर जिल्हा परिषदेत 57 जागांपैकी 28जागाआरक्षित असायला हव्या होत्या.परंतु,येथे ही 33 जागांचे आरक्षण जाहीर झाले.यात ओबीसींसाठी 15, एससी 10 आणि एसटी 8 जागांचा समावेश आहे. त्यामुळे या दोन्ही ठिकाणी आरक्षणाची पुनर्रचना करावी लागू शकते. जयंत कुमार बांठिया समर्पित आयोगाच्या कार्यक्षेत्रातील अटी प्रामुख्याने महाराष्ट्रातील इतर मागासवर्गीय(ओबीसी) लोकां च्या मागासलेपणाची अनुभव जन्य चौकशी करणे,गावपातळी वरील डेटा वापरून त्यांचे प्रतिनिधित्व निर्दिष्ट करणे आणि एकूण आरक्षण 50% मर्यादेपेक्षा जास्त होणार नाही याची खात्री करणे हे होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ओबीसींच्या आरक्षणाची तपासणी करण्या साठी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां मध्ये आरक्षण धोरणांचे मार्गदर्शन करण्यासाठी त्यांचे निष्कर्ष सादर करण्या साठी महाराष्ट्र सरकारने मार्च 2022 मध्ये या समर्पित आयोगाची स्थापना केली होती.ओबीसींच्या सामाजीक-आर्थिक स्थितीबद्दल कठोर आणि समकालीन डेटा गोळा करणे आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीं साठी च्या वैधानिक आरक्षणावर परिणाम न करता लोक संख्या आणि इतर निकषांवर आधारित योग्य आरक्षण टक्केवारीची शिफारस करणे हे या आयोगाचे काम होते. या अटींच्या प्रमुख बाबींमध्ये हे समाविष्ट होते: महाराष्ट्रातील ओबीसीं मधील मागासलेपणावर तपशीलवार आणि अनुभवजन्य अभ्यास करणे. प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेत त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसींसाठी राजकीय प्रतिनिधित्वाची व्याप्ती निर्दिष्ट करणे.सर्व श्रेणींसाठी एकूण आरक्षण कायद्याने अनिवार्य केलेल्या 50% मर्यादेचे पालन करते याची खात्री करणे. आवश्यकते नुसार संबंधित डेटा आणि आकडेवारी गोळा करण्या साठी विविध सरकारी विभाग आणि संस्थांशी सहकार्य करणे आदी बाबी असल्याची बाब सर्वोच्च न्यायालया तील मराठा समाजाच्या वतीने असणारे मुख्य हस्तक्षेप याचीकाकर्ता व जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी व्यक्त केले

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002